MHJG160012532025

| | | |
|---|---|---|
| स्वीकारल्याचा दिनांक | : | ३०/०६/२०२५ |
| नोंदणी दिनांक | : | ०१/०७/२०२५ |
| निकालाचा दिनांक | : | १४/०८/२०२६ |
| कालावधी | : | ०१वर्ष, ०१महिने, १५ दिवस |

**सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय, जामनेर यांच्या न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी वाय.एस.आखरे)

**म.सं.कौ.हिं.का.अ. क्र.७८/२०२५** **नि.क्र.१८.**

**०१.** **पुष्पाबाई नाना ताठे,**
वय : ५५ वर्षे, धंदा : घरकाम,
रा.गोद्री, ता.जामनेर, जि.जळगाव .... **अर्जदार**

**विरुध्द**

**०१.** **नाना रामकृष्ण ताठे,**
वय – ६० वर्षे, धंदा – शेती,

**०२.** **तुळसाबाई नाना ताठे,**
वय – ५२ वर्षे, धंदा – शेती,
गै.क्र.१ व २ रा.शेंगोळा,
ता.जामनेर, जि.जळगाव. .... **गैरअर्जदार**

**कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ च्या कलम १२ अन्वये**

अर्जदार तर्फे विधीज्ञ श्री. एस.डी.जाधव,
गैरअर्जदारांविरुध्द प्रकरण एकतर्फा.

**न्या य नि र्ण य**
(घोषित दिनांकः १४/०८/२०२६)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिंलाचे संरक्षण कायदा, २००५ च्या कलम १२ प्रमाणे दाखल केला आहे (यानंतर '**सदर कायदा**').

०२. **<u>अर्जदाराचे कथनः</u>**– अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचे लग्न तीस वर्षापुर्वी संपन्न झाले. सदर लग्नसंबंध अदयाप कायम आहे. अर्जदार ही लग्नानंतर पती व गैरअर्जदारांसोबत नांदण्यासाठी गेली. गैरअर्जदारांनी तिला मुलगी होईपर्यंत चांगले नांदविले. परंतु त्यानंतर गैरअर्जदारांनी तिला घरगुती कारणांवरुन त्रास देणे सुरु केले. तसेच तिला अश्लील शिवीगाळ करुन मारहाण देखील केली. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारास दारु पिऊन मारहाण करीत असे. तरी सुध्दा अर्जदार गैरअर्जदारांकडे नांदत होती. परंतु, चार पाच वर्षाने गैरअर्जदारांनी अर्जदाराच्या मुलभूत गरजा पुर्ण करणे बंद केले. तो तिला सोडून गेला. त्याने शेंगोळा येथे दुसरे लग्न केले आहे. तो बेकायदेशीरपणे दुस–या महिलेसोबत राहत आहे. त्याने अर्जदाराचा त्याग केला आहे.

०३. येणेप्रमाणे, अर्जदार ही गैरअर्जदारांच्या छळामुळे एकटी राहत आहे. आज रोजी तिच्याकडे स्वतःची उपजिवीका चालविण्यासाठी उत्पन्नाचे साधन नाही. याउलट गैरअर्जदारांकडे दुभत्या गायीम्हशी आहेत. त्यापासुन त्यांना दरमहा तीस ते पस्तीस हजार रुपये मिळतात. तसेच गैरअर्जदार क्र.१ हा गावातील शेती नफेबटाईने करतो. त्यापासुन त्यास वार्षिक सात ते आठ लाख रुपये उत्पन्न मिळते. त्यामुळे, अर्जदाराने गैरअर्जदारांकडून सदर कायद्याच्या कलम १८ ते २२ खाली आदेश मिळण्याची विनंती केली आहे.

०४. प्रकरण गैरअर्जदारांविरुध्द एकतर्फी व विनाजबाब आहे.

**०५.** अर्जदारातर्फे श्री.एस.डी.जाधव वकील यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच, अभिलेखावरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ उद्भवत असून त्यावरील निष्कर्ष व कारणे मी खालील प्रमाणे देत आहेः–

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | अर्जदाराने हे सिध्द केले आहे का की, गैरअर्जदाराने लग्नानंतर तिच्यावर वरीलप्रमाणे घरगुती हिंसाचार केला. ? | **होय.** |
| ०२. | अर्जदाराने हे सिध्द केले आहे का की, ती मागणी केल्याप्रमाणे गैरअर्जदाराकडून रहिवासाचा आदेश, संरक्षण आदेश, घरभाडयाचा आदेश, आर्थिक सहायय व नुकसान भरपाईचा आदेश मिळण्यास पात्र आहे. ? | **अंशतः होय.** |
| ०३. | काय आदेश ? | **अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.** |

**०६.** अर्जदाराने अर्जाच्या पुष्टयर्थ स्वतःचा पुरावा नि.क्र.१६ वर दिला. गैरअर्जदारांनी कोणताही पुरावा दाखल केला नाही.

## का र ण मि मां सा

**०७.** **मुद्दा क्र.१ करीताः**– अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. एस.डी.जाधव यांनी युक्तीवाद केला की, लग्नानंतर गैरअर्जदारांनी अर्जदाराचा वरील कारणांवरुन छळ करुन तिचा त्याग केला आहे.

०८. सदर युक्तीवादाला अनुसरुन अर्जदाराच्या नि.क्र.१६ वरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, तिने त्यामध्ये अर्जाप्रमाणेच कथन केले की, मुलीच्या जन्मानंतर गैरअर्जदारांनी तिचा उपरोक्त कारणांवरुन कौटूंबिक छळ केला व तिचा त्याग केला. प्रकरणात गैरअर्जदार हजर न झाल्याने अर्जदाराचा उपरोक्त शपथेवरील पुरावा हा विनाआव्हानित व अखंडित राहिला आहे. निर्विवादपणे, अर्जदाराचे उपरोक्त शपथेवर केलेली कथने ही सदर कायद्याच्या कलम ३ (अ,ब व क) नुसार 'घरगुती हिंसाचाराच्या' व्याख्येत मोडणारे आहे. जर अर्जदाराच्या उपरोक्त कथनाला गैरअर्जदारांचा विरोध असता किंवा त्यांच्याकडे इतर काही बचाव असता, तर निश्चितच ते प्रकरणात हजर होवून त्यांनी प्रकरणात त्यांचे म्हणणे सादर करुन अर्जदाराच्या पुराव्याला आव्हानित केले असते व तो खंडित करण्याचा प्रयत्न केला असता. परंतु, गैरअर्जदारांनी तसे न केल्यामुळे अर्जदाराच्या शपथेवरील पुराव्यावर विश्वास ठेवण्याखेरीज पर्याय नाही. **करीता मुददा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत आहे.**

०९. **<u>मुद्दा क्र.२ करीताः–</u>** अर्जदाराने सदर कायद्याच्या कलम १७ व १९ नुसार गैरअर्जदारांनी तिला घर वा राहण्याची वेगळी व्यवस्था करुन द्यावी अशी विनंती केली आहे. परंतु, गैरअर्जदारांकडे स्वत:च्या मालकीचे वा भाडयाचे घर आहे, असे तिने सबळ पुराव्यानिशी सिध्द केले नाही. पुढे तिला कोण्याठिकाणी व कश्याप्रकारची राहण्याची व्यवस्था हवी आहे, यासंबंधी तिने स्पष्ट पुरावा अभिलेखावर आणला नाही. वरील बाबी हया कलम १७ व १९ खाली रहिवासासंबंधी आदेश करतांना गरजेच्या आहेत. परंतु, सदर बाबी अर्जात व पुराव्यात नमुद नसल्याने त्यासंबंधी आदेश करता येणार नाही. करीता, अर्जदार ही सदर कलमाप्रमाणे रहिवासासंबंधी आदेश मिळण्यास पात्र नाही.

१०. अर्जदाराची पुढील मागणी ही गैरअर्जदारांनी तिच्यावर हिंसाचार करु नये अशी आहे. कलम १८ प्रमाणे घरगुती हिंसाचार सिध्द झाल्यास संरक्षण आदेश पारीत करता येतो.

प्रस्तूत प्रकरणात घरगुती हिंसाचार सिध्द झाला आहे. संरक्षण आदेशासंबंधी अर्जदाराने कथन केले की, सर्व गैरअर्जदार तिचा छळ करतात. सदर कथन अखंडीत राहिले आहे. त्यामुळे, गैरअर्जदाराकडून अर्जदाराचा भविष्यात छळ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे, अर्जदार ही संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे.

**११.** अर्जदाराच्या शेवटच्या मागण्या हया कलम २० व २२ प्रमाणे गैरअर्जदाराकडून रुपये २०,०००/– प्रति महिना आर्थिक सहाय्य व नुकसान भरपाई पोटी एकमुस्त रक्कम रु. ७,००,०००/– मिळण्याच्या आहेत. अर्जदाराप्रमाणे आज रोजी तिच्याकडे स्वतःचा सांभाळ करण्यासाठी पुरेसे उत्पन्नाचे साधन नाही. याउलट, गैरअर्जदारांकडे वरीलप्रमाणे आहे. निर्विवादपणे, गैरअर्जदारावर पती या नात्याने तिचा सांभाळ व संगोपण करण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे. परंतु, सदर जबाबदारी त्याने पूर्ण केल्याचे दिसत नाही. अर्जदाराप्रमाणे गैरअर्जदाराकडे दुभत्या म्हशी असून तो शेती नफेबटाईने सुध्दा करतो व त्यापासून त्याला वर नमुद केल्याप्रमाणे उत्पन्न आहे. परंतु, सदर व्यवसायाबाबत तिने कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. त्यामुळे गैरअर्जदाराकडे नमूद केल्याप्रमाणे उत्पन्नाचे साधन आहे हे सिध्द होत नाही. परंतु, कायद्याने शारीरिक सुदृढ व्यक्ती हा सुध्दा पोटगी देण्यास सक्षम समजला जातो. त्यामुळे गैरअर्जदार हा शारीरिक मेहनतीचे काम करुन मजूरी कमवू शकतो व त्यातून अर्जदाराचा सांभाळ करु शकतो. याउलट अर्जदाराकडे स्वतःचा सांभाळ व उदरनिर्वाह चालविण्या इतपत उत्पन्नाचे कोणतेही साधन असल्याचे दिसत नाही. गैरअर्जदार क्र.१ वर वर चर्चा केल्याप्रमाणे अर्जदाराला सांभाळण्याची कायदेशीर जबाबदारी असल्याने त्यास अर्जदाराला उदनिर्वाहासाठी आर्थिक मदत करणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे, त्याची क्षमता, अर्जदाराची गरज व आजची महागाई लक्षात घेता, माझे मते अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ कडून प्रतिमाह रुपये १,५००/– आर्थिक मदत मिळण्यास पात्र आहेत. तसेच, आजपर्यंत तिच्यावर झालेल्या घरगुती हिंसाचारापोटी ती गैरअर्जदाराकडून एकमुस्त रक्कम रुपये ५,०००/–

मिळण्यास पात्र आहे. **करीता, मुददा क्र.२ चे उत्तर वरील प्रमाणे दिले आहे.**

१२. **<u>मुद्दा क्र.३ करीताः</u>**– मुद्दा क्र.१ व २ च्या वरील निष्कर्षावरुन अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. करिता, आदेश.

**<u>आ दे श</u>**

**(१)** अर्ज अंशंतः खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

**(२)** गैरअर्जदार क्र.१ ला याद्वारे असे आदेशित करण्यात येते की, त्याने सदर अर्ज दाखल तारखेपासून अर्जदाराला आर्थिक सहाय्य/मदत म्हणून प्रतिमहिना रक्कम रुपये १,५००/– द्यावे.

**(३)** गैरअर्जदार क्र.१ ला याद्वारे असे आदेशित करण्यात येते की, त्याने नुकसान भरपाईपोटी अर्जदाराला एकमुस्त रक्कम रुपये ५,०००/– द्यावी.

**(४)** गैरअर्जदारांना याद्वारे असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी यापुढे अर्जदारावर कोणताही घरगुती हिंसाचार करु नये.

**(५)** सदर आदेशाची प्रत उभयपक्षांना विनामुल्य देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

YOGESH SAHADEO AKHARE
Digitally signed by YOGESH SAHADEO AKHARE
Date: 2026.08.14 16:54:49 +0530

**ठिकाण : जामनेर**
**दिनांकः १४/०८/२०२६**

**(वाय.एस.आखरे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, जामनेर**